# देखणी ती जीवने

## स्वाध्याय

**अ. आकलन**

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

**देखण्या व तेजस्वी डोळ्यांची वैशिष्ट्ये**

(१) (२)

**उत्तर:** १. या डोळ्यांत संपूर्ण आकाश सामावते.

२. हे डोळे दुसऱ्यांच्या दु:खाने पाणावतात.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**

**कवीच्या मते देखण्या पायांचे गुणधर्म**

१ | २

**उत्तर:** १. ध्येयाच्या मार्गावरून चालतात.

२. वाळवंटातसुद्धा स्वस्तिक, कमळे अशी शुभचिन्हे रेखाटतात.

**कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.**

**कवीच्या मते देखणे खांदे ते असतात**

↓

१

↓

२

उत्तर: १. जे स्वत:चे मरणही स्वेच्छेने वाहून नेतात.

२. मिळालेली आज्ञा प्राणपणाने पाळतात.

**कृ.४. ओघतक्ता पूर्ण करा.**

**कवीच्या मते देखणा देहान्त असा असतो**

↓

१

↓

२

उत्तर: १. दिवसभर प्रकाश देऊन अस्त पावणाऱ्या सूर्यासारखा.

२. रात्रीच्या गर्भात भविष्यातील अग्नीचा वारसा पेरणारा.

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**

१. **देखणे चेहरे याचे आरसे असतात** → [ ]

२. **देखण्या हातांना याचे डोहाळे लागतात** → [ ]

उत्तर: १. प्रांजळाचे २. निर्मितीचे

**कृ.६. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. 'देखणी ती जीवने' या कवितेचे कवी _______ आहे.

(बा. भ. गोरकर / बा. भ. बोरकर / बा. ग. बोरकर / बा. ब. बोरकर)

२. 'देखणी ती जीवने' ही कविता _______ या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

(समग्र बोरकर खंड - १ / समग्र गोरकर खंड - २ / समग्र बोरकर खंड - २ / समग्र बोरकर खंड - ३)

३. तेच डोळे देखणे जे कोंडिती साऱ्या _______ ।

(जगा / नभा / घरा / आभा)

४. देखणे ते _______ ज्यां ये सूळ नेता स्वेच्छया।

(स्कंध / हात / पाय / बाहू)

**उत्तर:** १. बा. भ. बोरकर

२. समग्र बोरकर खंड - २

३. नभा

४. स्कंध

**कृ.७. दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ज्यांच्या लाघवाने _______, ते ओठ सुंदर असतात.

अ. सत्य कोवळे होते

ब. सत्य कटू होते

क. सत्य प्रखर होते

ड. सत्य गोड होते

२. ________ ज्यांचे जीवन असते तेच खरे देखणे जीवन होय.

अ. तृप्तीच्या रसाप्रमाणे

ब. समाधानाच्या घोटाप्रमाणे

क. तृप्तीच्या तीर्थोदकाप्रमाणे

ड. तृप्तीच्या अंगाऱ्याप्रमाणे

उत्तर: १. ज्यांच्या लाघवाने **सत्य कोवळे होते,** ते ओठ सुंदर असतात.

२. **तृप्तीच्या तीर्थोदकाप्रमाणे** ज्यांचे जीवन असते तेच खरे देखणे जीवन होय.

**कृ.८. सत्य विधान शोधून लिहा.**

त्यांची जीवने देखणी असतात –

अ. ज्यांचे चेहरे गौरवर्णाचे असतात.

ब. ज्यांचे डोळे दुसऱ्यांच्या दु:खात हसरे असतात.

क. ज्यांच्या ओठावर सदा कटू बोल असतात.

ड. ज्यांचे हात नवनिर्मितीच्या मंगल गंधाने भारलेले असतात.

**क्र.९. असत्य विधान शोधून लिहा.**

त्यांची जीवने सुंदर असतात –

अ. जे माणसाच्या बाह्यसौंदर्याला महत्त्व देतात.

ब. ज्यांच्या ओठातून कठोर सत्यही मृदू होऊन बाहेर पडते.

क. ज्यांची पावले स्वत:च्या निश्चित ध्येयाप्रत जातात.

ड. ज्यांचे खांदे स्वत:चे मरणही स्वेच्छेने खांद्यावर वाहून नेतात.

**उत्तर:** जे माणसाच्या बाह्यसौंदर्याला महत्त्व देतात.

**क्र.१०. कवितेवर आधारित प्रश्न**

**१. 'देखणे ते स्कंध ज्यां ये, सूळ नेता स्वेच्छया ।' या काव्यपंक्तीतून नेमका काय अर्थबोध होतो?**

**उत्तर:** 'देखणी ती जीवने' या कवी बा. भ. बोरकर यांच्या भावकवितेतील ही पंक्ती आहे. माणसाचे जीवन देखणे आहे हे सांगताना कवी म्हणतात, ज्यांनी स्वत:च्या खांद्यावर स्वत:चे मरण पेलले, स्वच्छेने ज्यांनी स्वत:च्या मरणाचा सूळ खांद्यावर वाहून नेला, तसेच ज्यांनी मातृभूमीसाठी स्वत:चे प्राण फुंकले त्यांचे जीवन देखणे आहे. निर्भयपणे मरणाला सामोरे जाण्याचे ज्यांनी सामर्थ्य दाखवले त्यांचे जीवन सुंदर आहे.

२. **'अग्निचा पेरून जातो, रात्रगर्भी वारसा।' या काव्यपंक्तीचा आशय स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'देखणी ती जीवने' या कवी बा. भ. बोरकर यांच्या कवितेत त्यांनी माणसाच्या बाह्यसौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्य महत्त्वपूर्ण असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते, मावळत्या सूर्याचे मरण देखणे असते; कारण तो अस्ताला जाताना रात्रीच्या गर्भात अग्नीचा वारसा पेरून जातो. येथे सूर्याच्या प्रतिमेतून कवी, जे भविष्यातील पिढीसाठी नवविचारांचा, नवज्ञानाचा वारसा पेरून अस्ताला जातात, त्यांच्या मरणाबद्दल बोलत आहे. त्यांचे मरणेही कवीला देखणे वाटते. अपरिहार्य व अटळ असा मृत्यूही येथे गौरवशाली वाटतो.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. पद्म : कमळ : : [ ] : मृत्यू

२. [ ] : कुरूप : : सूर्यास्त : सूर्योदय

**उत्तर:** १. देहान्त    २. देखणे

**कृ.२. खालील शब्दांना कवितेत वापरलेले पर्यायी शब्द लिहा.**

| डोळे | सुंदर | बलिवेदी | समुद्री | मार्दव | मुद्रा |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**उत्तर:** १. नेत्र    २. देखणे

३. सूळ    ४. सागरी

५. लाघव    ६. चेहरा

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. डोळे, ओठ, पावले, सूळ

२. प्राण, सोहळा, जीवन, देहान्त

**उत्तर:** १. सूळ    २. सोहळा

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. तीर्थ : [ ] [ ]


२. प्राण : [ ] [ ]

**उत्तर:** १. तीर्थक्षेत्र, तीर्थोदक

२. प्राणार्पण, प्राणघातक

## क. माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. दिलेले विशेषण कोणकोणत्या विशेष्यांसाठी वापरले आहे ते लिहून आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर:

| | |
|---|---|
| १. चेहरे | २. डोळे |
| ३. ओठ | ४. हात |
| ५. पावले | ६. स्कंध / खांदे |
| ७. जीवने | ८. देहान्त / मृत्यू |

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.**

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| प्रांजळाचे | | | |
| लाघवाने | | | |
| रात्रगर्भी | | | |

**उत्तर:**

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| प्रांजळाचे | प्रांजळा | चे | षष्ठी |
| लाघवाने | लाघवा | ने | तृतीया |
| रात्रगर्भी | रात्रगर्भ | ई | सप्तमी |

**कृ.३. दिलेल्या अव्ययांचा वाक्यांत उपयोग करा.**

१. आणि

**वाक्य:**पु. ल. देशपांडे **आणि** द. मा. मिरासदार हे माझे आवडते विनोदी लेखक आहेत.

२. ....... सारखे

**वाक्य:**जगणे नदीच्या पाण्या**सारखे** सतत प्रवाही असावे.

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. मुक्ताफळे २. ध्यासपंथ

३. तीर्थोदक

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | मुक्ताफळे | मुक्त अशी फळे | कर्मधारय समास |
| २. | ध्यासपंथ | ध्यासरूपी पंथ | कर्मधारय समास |
| ३. | तीर्थोदक | तीर्थासारखे उदक | कर्मधारय समास |

**कृ.५. खालील कोष्टक पूर्ण करा.**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १. | चेहरा | |
| २. | ओठ | |
| ३. | | तीर्थोदके |
| ४. | | आरसे |

उत्तर:

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १. | चेहरा | **चेहरे** |
| २. | ओठ | **ओठ** |
| ३. | **तीर्थोदक** | तीर्थोदके |
| ४. | **आरसा** | आरसे |

**कृ.६. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. तिर्थोदके | तीर्थोदके | तीथोर्दके | तिथ्रोदके

२. सूर्योत्ससा | सूर्यात्ससा | सूर्यास्तसा | सुर्यास्तसा

३. स्वस्तिपद्मे | स्वस्तिपदमे | स्वस्तीपद्मे | सवस्तीपद्मे

४. मूक्ताफळे | मूक्तफळे | मुक्ताफळे | मुक्ताफले

उत्तर: १ तीर्थोदके २. सूर्यास्तसा

३. स्वस्तिपद्मे ४. मुक्ताफळे

**ड. माझे मत**

**कृ.१. 'देखणी ती जीवने' या कवितेचा आशय स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'देखणी ती जीवने' या कवितेमध्ये बा. भ. बोरकर यांनी बाह्यसौंदर्यापेक्षा अंतर्मनाला जास्त महत्त्व दिलेले आहे.

देखण्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष सांगताना कवी म्हणतात, प्रामाणिकपणाचा आरसा दाखविणारा चेहरा कधीही सुंदरच असतो. ज्या डोळ्यांत अथांग आभाळ

समाविष्ट करण्याची ताकद असते, ज्या डोळयांत परदु:खाने कारुण्य उभे राहते ते डोळे नेहमी सुंदरच असतात. तसेच ज्यांच्या ओठांच्या स्पर्शाने, बोलांच्या गोडव्याने कठोर सत्यही मुलायम होते, ज्यांचे हात नवनिर्मितीतून सौंदर्य निर्माण करण्यात नेहमी उद्योगशील असतात, ती व्यक्तिमत्त्वे नेहमी देखणीच असतात. ज्यांचे पाय ध्येयाच्या मार्गावर चालतात, जे आपल्या वचनासाठी, आपल्या ध्येयपूर्तीसाठी आपल्या खांद्यावरूनच आपले सूळ नेतात आणि हसत हसत मरणाला कवटाळतात, ती व्यक्तिमत्त्वं देखणी असतात. जे समाधानी आहेत, ज्यांची आयुष्ये कृतार्थतेची पवित्र तीर्थे आहेत ती पारदर्शक व्यक्तिमत्त्वं सुंदर असतात. जी माणसे दुसऱ्यांसाठी जगतात व मरणानंतरही पुढच्या पिढ्यांना नवविचारांचा वारसा देऊन जातात त्यांचे मरण सुंदर असते, अशा व्यक्ती मृत्यूनंतरही स्मरणात राहतात.

**कृ.२. दुसऱ्यांसाठी जगून ज्यांनी आपले आयुष्य देखणे केले, अशा तुमच्या माहितीतील व्यक्तीची माहिती लिहा.**

**उत्तर:** गडचिरोलीमधील आदिवासींच्या आरोग्यासाठी काम करणारे डॉ. अभय व राणी बंग हे दाम्पत्य 'देखण्या जीवनाचे' उत्तम उदाहरण आहे. नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालयातून डॉक्टरची पदवी घेतलेल्या या दाम्पत्याने गडचिरोली येथील आदिवासी भागात आरोग्यसेवा करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी 'सर्च' नावाची सार्वजनिक वैद्यकीय संस्था स्थापन केली. वाढता बालमृत्यूदर ही या भागातील गंभीर समस्या होती. बंग दाम्पत्याने बालमृत्यूमागची मुख्य कारणे शोधली व त्यावर उपाययोजना केली. गावातील दाईंनाच थोडे वैद्यकीय प्रशिक्षण देऊन घरोघरी वैद्यकीय पद्धतीने बाळंतपणे सुरू केली. त्यामुळे माता व बालमृत्यू दोन्ही आटोक्यात आणण्यात त्यांना यश मिळाले. गडचिरोलीतील आदिवासींची दारूच्या व्यसनातून सुटका करणे, महिलांच्या आरोग्यात सुधारणा करणे अशी अनेक कामं त्यांनी झोकून देऊन केली. त्यांच्या या कामाची सर्व जगाने दखल घेतल्याने ते अनेक पुरस्कारांचे धनी झाले. आजही हे दाम्पत्य नि:स्वार्थ भावनेने आदिवासींच्या आरोग्य संवर्धनासाठी कार्यरत आहे. देखणे जीवन म्हणतात ते यालाच!